# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ

नांदेड–४३१ ६०६(महाराष्ट्र)

SWAMI RAMA NAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY

NANDED – 431606, MAHARASHTRA STATE, INDIA

Established on 17 September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with **'B++'** Grade

## Estate Department

संदर्भ : संपदा/**General file/**२०२४-२०२५/५०-A

दिनांक ६६.०६.२०२४

## परिपत्रक

या परिपत्रकान्वये सर्व शैक्षणिक संकुले, प्रशासकीय विभाग, उपकेंद्र लातूर, न्यू मॉडल डिग्री कॉलेज, हिंगोली, उपकेंद्र, परभणी आणि कै.उत्तमराव राठोड आदिवासी संशोदर केंद्र, किनवट यांना कळविण्यात येते की, विद्यापीठात होणाऱ्या विविध खरेदी करीता वेगवेगळया तज्ञ समिती नियुक्ती बाबत दि.१४.०५.२०२४ रोजी संपन्न झालेल्या खरेदी समितीच्या बैठकीत **विषय क्र.१९.४** प्रमाणे **विद्यापीठात विविध संकुलात, क्रीडा विभागात तसेच उपपरिसरात विविध साहित्य व उपकरणे खरेदी करण्यात येत असतात. तथापि, सदर साहित्य व उपकरणे खरेदी करीता खालील समिती मार्फत शिफारस करणे अनिवार्य असे सर्वानुमते ठरले.**

**प्रकल्प संचालक, विभागाचे प्रमुख/संचालक, मा.कुलगुरु नामनिर्देशीत प्राध्यापक, मा.कुलगुरु नामनिर्देशीत व्यवस्थापन परिषद सदस्य, मा.कुलगुरु नामनिर्देशीत खरेदी समिती सदस्य व आवश्यकता असल्यास एक तज्ञ.**

**सदर समितीने साहित्याचे/उपकरणाचे सर्व स्पेशीफिकेशन व सदर उपकरण स्थापत्य (Installation) करण्यासाठी आवश्यक असणारे सहाय्यक उपकरणे व भौतिक सुविधा विभागात उपलब्ध आहेत किंवा कसे नसतील तर खरेदी करावयाच्या साहित्याची सविस्तर माहिती सोबत द्यावी व निविदा उघडल्यानंतर त्याच समितीने आपला सुस्पष्ट अहवाल द्यावा ज्या आधारे मा.खरेदी समितीस निर्णय घेणे सुकर होईल, अशा आशयाचा ठराव पारित करण्यात आलेला आहे.**

तरी, यापूढे कोणत्याही साहित्याची मागणी करत असतांना उपरोक्त समिती मार्फत व लेखा संहिता नियमातील **Appendix-VII** नमुना प्रमाणे स्टॉक व्हेरिफिकेशन रिपोर्टसह समितीच्या स्वातंत्र अहवाला सोबत प्रशासकीय मान्यता घेवून मागणी संपदा विभागात पाठविण्यात यावी. असे न केल्यास खरेदीची पूढील कार्यवाही होणार नाही. तसेच त्यामुळे होणा-या दिरंगाईस वित्त व लेखा विभाग जबाबदार राहणार नाही. कृपया याची नोंद घ्यावी.

प्र. वित्त व लेखाधिकारी

प्रत माहिती व कार्यवाहीस्तव:

१) मा.कुलगुरु महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
२) मा.प्र-कुलगुरु महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
३) मा.कुलसचिव यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
४) मा.संचालक, सर्व शैक्षणिक संकुले, प्रस्तुत विद्यापीठ
५) मा.विभाग प्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
६) मा.संचालक, उपकेंद्र, लातूर
७) मा.प्राचार्य, न्यु मॉडल डिग्री कॉलेज, हिंगोली
८) मा.संचालक, उपकेंद्र, परभणी
९) मा.समन्वयक, कै.उत्तमराव राठोड आदिवासी संशोदन केंद्र, किनवट
१०) सिस्टिम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ- सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.